# २८ व्या विस्तार शिक्षण परिषद बैठकीचा इतिवृतांत

विस्तार शिक्षण परिषदेची २८ वी बैठक दि २५ सप्टेंबर, २०२० रोजी सकाळी ११.०० वा मायक्रोसॉफ्ट टिम ॲप द्वारे ऑनलाईन सभा आयोजित करण्यात आली. या सभेला मा. डॉ. व्ही. एम. भाले, कुलगुरू, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते तर विद्यापीठाचे संचालक, शिक्षण, डॉ. एम. बी. नागदेवे, संचालक, संशोधन, डॉ. व्ही. के. खर्चे, संचालक, विस्तार शिक्षण तथा सभेचे सचिव म्हणून डॉ. डी. एम. मानकर, विभाग प्रमुख, विस्तार शिक्षण, डॉ. एन. आर. कोष्टी तसेच जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अकोला श्री. कांतप्पा खोत, कृषि विकास अधिकारी, जि.प., अकोला श्री. मुरली इंगळे, त्याचप्रमाणे शेतकरी प्रतिनिधी तथा स्विकृत सदस्य म्हणून श्री. दिलीप फुके व सौ. जयश्री गुंबळे आणि आमंत्रित अधिकारी आदीची उपस्थिती लाभली होती. विषय पत्रिका टिप्पणी नुसार दि. १६ मे, २०१९ रोजी पार पडलेल्या २७ व्या विस्तार शिक्षण परिषद बैठकीचे इतिवृत्त, बैठकीमध्ये घेण्यात आलेले निर्णय व निर्णयानुसार झालेल्या कार्यवाहीचे वाचन करण्यात आले व त्यास सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

डॉ. एन. एम. काळे, मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी यांनी सन २०१९-२० मध्ये आयोजित विस्तार शिक्षण कार्यक्रमाबाबतचे तसेच सन २०२०-२१ मध्ये प्रस्तावित विस्तार शिक्षण कार्यक्रमांचे सविस्तर सादरीकरण केले व सभागृहाने त्यास मान्यता दिली.

सभेत श्री. दिलीप फुके यांनी दत्तक गावात बदल कधी व केव्हा करता येईल?, निवडक शेतकऱ्यांसाठी शिवार फेरीचे आयोजन करता येईल काय ? कृषि पत्रिकेमध्ये शेतकऱ्यांच्या यशोगाथा प्रसारीत करण्याबाबत विचार मांडले. तर सौ. जयश्री गुंबळे यांनी फळप्रक्रिया बाबतची प्रशिक्षणे विद्यापीठाने / कृषि विज्ञान केंद्रांनी घ्यावी याबाबत सुचना केल्यात.

यानंतर डॉ. दिलीप मानकर यांनी विस्तार शिक्षण परिषदेचे महत्व विशद केले. तर श्री. कांतप्पा खोत यांनी विकेल ते पिकेल या शासनाच्या नविन धोरणावर प्रकाश टाकला. डॉ. विलास खर्चे, संचालक संशोधन यांनी जिल्हयाच्या प्रत्येक ठिकाणी छोटेखानी शिवार फेरीचे आयोजन करता येईल व बीज दिवस आयोजनाबाबत विचार मांडले.

सभेच्या शेवटी अध्यक्ष महोदय, डॉ. विलास भाले, कुलगुरू यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामधून विकेल ते पिकेल या शासनाच्या धोरणानुसार जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व कृषि विकास अधिकारी, अकोला यांचे माध्यमातून काय करता येईल?, दत्तक गाव रेडवा मध्ये कोणती कामे करावीत या विषयी मार्गदर्शन केले. करडई, सुर्यफुल व रबी ज्वारीचे सामूहीक प्रात्यक्षिके आयोजनावर भर दिला व तेल काढण्याचे छोटे यंत्र गावोगावी कसे उभे राहतील, खारपाण पट्ट्यात ओवा पीक जास्त प्रमाणात घेण्याबाबतचे प्रयत्न करावेत तसेच विस्तार शिक्षण संचालनालयाद्वारे राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रम आयोजनाबाबत व विस्तार शिक्षण कार्यक्रम अधिक प्रभावी होण्याच्या दृष्टीने सर्व उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या सभेमध्ये काही विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ.क्र. | निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|
| १ | रेडवा गावात विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी वारंवार भेटी द्याव्यात. जेणेकरून तंत्रज्ञान अवलंबन होण्यास गावकऱ्यांचे मत परिवर्तन होईल व गावाचा विकास होईल. | • सर्व विभाग प्रमुख, डॉ. पंदेकृवि, अकोला<br>• सर्व वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, डॉ. पंदेकृवि, अकोला<br>• प्रभारी अधिकारी, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला |
| २ | शिवार फेरी २०२० चे आयोजन विद्यापीठाचे कृषि | • सर्व कार्यक्रम समन्वयक, कृ.वि.के. |

| | | |
|---|---|---|
| | विज्ञान केंद्रे व निवडक कृषि संशोधन केंद्रे यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात याव्या. | • प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्रे, डॉ. पंदेकृवि, अकोला |
| ३ | अन्नधान्य / फळ प्रक्रिया प्रशिक्षणाचे आयोजन करावे. | • सर्व कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र<br>• विभाग प्रमुख, फळशास्त्र विभाग, डॉ. पंदेकृवि, अकोला |
| ४ | शेतकरी उत्पादक कंपन्यांना ॲग्रोटेकमध्ये सहभागी करुन घ्यावे | विस्तार शिक्षण संचालनालय, डॉ. पंदेकृवि, अकोला |
| ५ | ज्वारी / करडई पिकांचे समुह प्रात्यक्षिके आयोजित करावे. | • प्रभारी अधिकारी, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला<br>• वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, ज्वारी विभाग व तेलबीया विभाग, डॉ. पंदेकृवि, अकोला |
| ६ | पिकेल ते विकेल या शासनाच्या धोरणानुसार विद्यापीठाचे संचालक संशोधन व कृषि विभागाचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कृषि विकास अधिकारी आणि विभागीय कृषि सहसंचालक यांच्या समन्वयाने सदर धोरण कसे कार्यान्वयीत करता येईल याबाबत कृती आराखडा तयार करावा. | • संचालक संशोधन, डॉ. पंदेकृवि, अकोला<br>• जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अकोला<br>• कृषि विकास अधिकारी, जि.प., अकोला<br>• विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती |

श्री. एन. एम. काळे, मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी यांनी संचालन तर श्री. एस. पी. सलामे, मुख्य संपादक यांनी सभेचे आभार प्रदर्शन केले.

संचालक विस्तार शिक्षण

अध्यक्ष
विस्तार शिक्षण परिषद तथा
कुलगुरु, डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला

प्रपत्र - १

२८ वी विस्तार शिक्षण परिषद बैठकीत उपस्थित सभासदांची यादी

| अ.क्र. | सहभागी सभासदांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ. व्ही. एम. भाले | मा. कुलगुरु व अध्यक्ष |
| २ | डॉ. डी. एम. मानकर | संचालक, विस्तार शिक्षण तथा सचिव |
| ३ | डॉ. व्ही. के. खर्चे | संचालक संशोधन तथा सभासद |
| ४ | डॉ. एम. बी. नागदेवे | संचालक, शिक्षण तथा अधिष्ठाता कृषि अभियांत्रिकी तथा सभासद |
| ५ | डॉ. एन. आर. कोष्टी | विभाग प्रमुख, विस्तार शिक्षण तथा सभासद |
| ६ | डॉ. एन. एम. काळे | मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी, विशिसं तथा सभासद |
| ७ | श्री. कांतप्पा खोत | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अकोला तथा स्विकृत सदस्य |
| ८ | डॉ. मुरली इंगळे | कृषि विकास अधिकारी, जि.प., अकोला तथा स्विकृत सदस्य |
| ९ | श्री. दिलीप नारायण फुके | प्रगतशिल शेतकरी तथा स्विकृत सदस्य |
| १० | सौ. जयश्री गुंबळे | प्रगतशिल शेतकरी तथा स्विकृत सदस्य |
| ११ | डॉ. पी. के. वाकळे | प्राध्यापक, विस्तार शिक्षण संचालनालय तथा आमंत्रित |
| १२ | डॉ. व्हि. ए. खडसे | विस्तार कृषि विद्यावेत्ता तथा आमंत्रित |
| १३ | श्री. आर. एल. ईसाळ | सहयोगी प्राध्यापक, विस्तार शिक्षण संचालनालय तथा आमंत्रित |
| १४ | श्री. एस. पी. सलामे | मुख्य संपादक, विशिसं तथा आमंत्रित |
| १५ | डॉ. एन. पी. जंगवाड | विस्तार प्रशिक्षण अधिकारी, विशिसं तथा आमंत्रित |
| १६ | डॉ. के. यु. बिडवे | प्रभारी आधिकारी, शेतकरी सदन तथा आमंत्रित |
| १७ | डॉ. एस. डी. मोरे | प्रभारी अधिकारी, विद्यापीठ मुद्रणालय तथा आमंत्रित |
| १८ | श्री. डी. एस. देवपुजारी | प्रभारी अधिकारी, डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती केंद्र तथा आमंत्रित |